D:\APA 2024\Letter 2024.doc


# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ

**कृषि नगर, वसमत रोड, परभणी - ४३१ ४०२ (महाराष्ट्र)**

| ई-मेल | : reg_mau@rediffmail.com | दूरध्वनी | : (०२४५२) २२९७५५ |
|---|---|---|---|
| वेबसाईट | : www.vnmkv.nic.in | फॅक्स | : (०२४५२) २२९७५५, २२३५८२ |


वाचा :

४) महाराष्ट्र शासन कृषि व पदूम विभाग मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र.अेजीयू-३७१९/ सिआर-४१/६-ए दिनांक १२.८.२०२१

५) महाराष्ट्र शासन कृषि व पदूम विभाग मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र.अेजीयू-३७२१/ सिआर-१५०/६-ए दिनांक १९.९.२०२२

६) महाराष्ट्र शासन कृषि व पदूम विभाग मंत्रालय, मुंबई अधिसुचना क्र.मकृप-१०२३/सिआर-२४/६-ए दिनांक ३०.६.२०२३

**कॅस अंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मंजूर करण्यासाठी आवश्यक असलेले शैक्षणिक कामगिरी निर्देशांक (अेपीआय स्कोअर कार्ड) तयार करण्यासाठी दरवर्षी १ जुन ते ३० जुन या कालावधीत प्रस्ताव सादर करणे बाबत.**

## विद्यापीठ परिपत्रक

क्र.२०२४/प्र.क्र.१३०१/कॅस /आस्था-१/2601

दिनांक : २० मे २०२४ 21

**परिपत्रक :**

संदर्भ क्र.१ वरील शासन निर्णयान्वये कृषि विद्यापीठातील शिक्षकवर्गीय अधिका-यांना ७ वा वेतन आयोग लागू करण्यात आलेला आहे. संदर्भ क्र.२ व ३ वरील शासन निर्णयान्वये सातव्या वेतन आयोगानुसार शिक्षकवर्गीय अधिका-यांना कॅस अंतर्गत वेतनश्रेणीचा लाभ मंजूर करण्याबाबतच्या पात्रता, तरतूदी व इतर अनुषंगीक बाबी स्पष्ट केलेल्या आहेत.

त्या अनुषंगाने विद्यापीठातील सर्व शिक्षकवर्गीय अधिका-यांना सुचित करण्यात येते की, कॅस अंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मंजूर करण्यासाठी आवश्यक असलेले शैक्षणिक कामगिरी निर्देशांक (अेपीआय स्कोअर कार्ड) तयार करण्यासाठी दिनांक १ जुन ते ३० जुन या कालावधीमध्ये प्रस्ताव मागविण्यात येणार आहेत.

त्या अनुषंगाने विद्यापीठातील सर्व शिक्षकवर्गीय अधिका-यांनी सन २०२३-२४ या वर्षासह मागील त्यांचे ज्या वर्षाचे शैक्षणिक कामगिरी निर्देशांक अेपीआय स्कोअर कार्ड तयार नाही. त्यांनी स्कोअर कार्ड तयार करण्याकरीता **दिनांक ३० जुन २०२४ पर्यंत प्रस्ताव सादर करावेत**. यानंतर मागील कोणत्याही कालावधीचे अेपीआय स्कोअर कार्ड साठी प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत तसेच त्यांना मागील कोणत्याही वर्षाचे अेपीआय स्कोअर मिळणार नाही.

तसेच या वर्षीपासून दरवर्षी दि.१ जुन ते ३० जुन या कालावधीमध्ये प्रस्ताव मागवून मागील वर्षाचे अेपीआय स्कोअर कार्ड तयार करून दिले जाणार आहेत. जे अधिकारी सदर मुदतीत मागील वर्षाचे प्रस्ताव सादर करून अेपीआय स्कोअर कार्ड तयार करून घेणार नाहीत त्यांना पुढील वर्षी मागील वर्षाचे अेपीआय स्कोअर कार्ड मिळणार नाही. त्यामुळे त्यांना कॅस अंतर्गत वेतनश्रेणीचा लाभ पुढे गेल्यास त्यास ते सर्वस्वी जबाबदार राहतील .

विहित मुदतीत प्रस्ताव सादर न केल्यास अथवा अपुर्ण प्रस्ताव सादर केल्यामुळे कॅस अंतर्गत प्राध्यापक पदाची वेतनश्रेणी मंजूर करण्यास अपात्र झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहील याची नोंद घ्यावी.

मा.कुलगुरू महोदय यांच्या मान्यतेने.

(पु.क्रो.काळे)
कुलसचिव

प्रत :

१. संचालक (सर्व) वनामकृवि, परभणी यांना देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या अधिनस्त सर्व कार्यालयाच्या कार्यरत पात्र शिक्षकवर्गीय अधिका-याच्या निर्दशनास आणून द्यावे.

२. नियंत्रक वनामकृवि, परभणी.